स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान शाखा अंतर्गत इतिहास विषयाच्या

पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

“सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वारसा पर्यटन स्थळे : एक ऐतिहासिक अभ्यास”

Heritage Tourism in Sindhudurg District: A Historical Study

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधक विद्यार्थी

प्रियांका विनायक पाटील

एम. ए. सेट

मु. पो. कणकवली, शिवाजीनगर

ता. कणकवली, जिल्हा - सिंधुदुर्ग

मो. नं. 7887545677

Email Id: devshripa15@gmail.com

संशोधक मार्गदर्शक

प्रा. डॉ.आर.एस.पारवे

इतिहास विभाग प्रमुख व मार्गदर्शक

दयानंद कला महाविद्यालय,

ता. लातूर, जिल्हा-लातूर

मो. नं. 9403132111

संशोधन केंद्र

नूतन महाविद्यालय सेलू, जि. परभणी

(जानेवारी 2024)

अनुक्रमणिका

अ. क्र.	तपशील
१	प्रस्तावना व संशोधन पद्धती
२	संशोधन अभ्यासाचे शीर्षक
३	संशोधन अभ्यासाच्या मर्यादा
४	संशोधन विषयाचे महत्व
५	संशोधन साहित्याचा पूर्व आढावा
६	संशोधनाची उद्दिष्ट्ये
७	संशोधनाची गृहितके
८	संशोधन पद्धती
९	तथ्य संकलन
१०	संशोधन प्रकरण रचना
११	संदर्भ सूची

सिंधुदुर्ग जिल्हयातील वारसा पर्यटन स्थळे : एक ऐतिहासिक अभ्यास

Heritage Tourism in Sindhudurg District: - A Historical Study

प्रस्तावना :

प्रवास ही माणसाची फार प्राचीन काळापासूनची आवड आहे. यात पर्यटक हा मुलभुत नसला तरी प्रवास करण्याचे हेतु मात्र विविधांगी असतात. अज्ञात प्रदेशचा शोध घेणे, शिक्षण, व्यापार, धार्मिक स्थळांना भेटी यासह अनेक कारणांसाठी पर्यटन केले जाते. पहिल्या महायुद्धानंतर पर्यटन हा सेवा उद्योग महणून समोर आला आहे. त्यामध्ये रोजगारभिमुखता अधिक आहे. अलीकडे काही देशांमध्ये पर्यटन हा अर्थव्यवस्थेचा कणा बनत चालला आहे. वाहतुकीच्या साधनात झालेले बदल, रस्ते, शहरीकरण, उद्योगधंदयांची वाढ, शिक्षणाचा प्रसार अशा कारणांमुळे पर्यटनास गती मिळत आहे. महाराष्ट्र राज्याचा पर्यटन दृष्टीने विचार केल्यास अनेक पर्यटन स्थळे नावारूपास आलेली दिसतात.

सिंधुदुर्ग हा महाराष्ट्र राज्यातील जिल्हा १९९७ साली पहिला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला. निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या सिंधुदुर्ग जिल्हयात समुद्रकिनारे, धबधबे, किल्ले, धार्मिक स्थळे, थंड हवेची ठिकाणे अशी अनेक पर्यटनस्थळे पर्यटकांना आकर्षित करतात. पण या सर्वांसोबत सिंधुदुर्ग जिल्हयात इतिहासाचा वारसा सांगणारी अनेक ऐतिहासिक वारसा पर्यटन स्थळे आहेत. यामध्ये ऐतिहासिक किल्ले, धार्मिक स्थळे, प्राचीन मंदिरे, कातळशिल्पे, राजवाडे, वखारी, बंदरे, हुतात्मा स्मारके, सत्याग्रहाची ठिकाणे यांसारख्या स्थळांचा समावेश होतो. आजच्या तरुण वर्गाला या ऐतिहासिक स्थळांविषयी जिज्ञासा व आवड निर्माण होऊ लागली आहे. ती जोपासली जाणे गरजेचे आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयातील या ऐतिहासिक वारसा पर्यटन स्थळांचा एकत्रित अभ्यास होणे आवश्यक असल्याने प्रस्तुत विषयावर संशोधन करण्याचे प्रस्तावित आहे.

संशोधन अभ्यासाचे शीर्षक :

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ऐतिहासिक पर्यटन वारसा स्थळांचे आकलन होण्यासाठी **"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वारसा पर्यटन स्थळे - एक ऐतिहासिक अभ्यास"** या विषयावर संशोधन करण्याचे प्रस्तावित आहे.

संशोधन अभ्यासाच्या मर्यादा :

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वारसा पर्यटन स्थळे - एक ऐतिहासिक अभ्यास" या विषयाच्या अंतर्गत फक्त सिंधुदुर्ग जिल्ह्यातीलच ऐतिहासिक वारसा स्थळांचाच अभ्यास करणे प्रस्तावित आहे.

संशोधन विषयाचे महत्व :

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वारसा पर्यटन स्थळे - एक ऐतिहासिक अभ्यास" या विषयाच्या संशोधनामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील इतिहासाचा वारसा सांगणारी अनेक ऐतिहासिक स्थळे, त्यांचा इतिहास, महत्व एकत्रित स्वरूपात प्रकाश झोतात येणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन व्यवसायाच्या वाढीसाठी ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा उपयोग होऊ शकतो.

१९९७ मध्ये सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला. पर्यटकांना आकर्षित करणारी अनेक स्थळे या ठिकाणी आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोठे उद्योगधंदे किंवा कारखाने नसल्याने तरुण वर्गाचे रोजगारासाठी मुंबई, पुणे या शहरांकडे जाण्याचे प्रमाण जास्त आहे. परिणामी अतिरिक्त लोकसंख्येच्या भारामुळे शहरात असुविधा निर्माण होतात व खेडी मात्र ओस पडतात यावर उपाय म्हणून तरुण वर्गाने आर्थिक साधने स्थानिक पातळीवर शोधल्यास स्थानिक रोजगार उपलब्ध होऊ शकतो या पार्श्वभूमीवर येथील वारसा पर्यटन स्थळांचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास होणे गरजेचे वाटल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वारसा पर्यटन स्थळे - एक ऐतिहासिक अभ्यास हा विषय निवडला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक ऐतिहासिक स्थळे, कातळशिल्पे, लेणी, मंदिरे दुर्लक्षित असून ती प्रकाशात येणे गरजेचे आहे. जिल्ह्यातच पर्यटनावर आधारित लहान मोठे व्यवसाय उपलब्ध झाल्यास जिल्ह्याचे आर्थिक चित्र बदलू शकते एकंदरीत ऐतिहासिक वारसा पर्यटनाच्या अभ्यासाने सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक जाणीवा अधिक प्रगल्भ होऊ शकतात.

संशोधन साहित्याचा पूर्व आढावा :

"सिंधुदुर्ग जिल्हयातील वारसा पर्यटन स्थळे - एक अभ्यास" या विषयावर महाराष्ट्रातील किंवा देशातील कोणत्याही विद्यापीठात स्वतंत्रपणे संशोधन झालेले नाही. या विषयाच्या अभ्यासामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे, स्मारके, कातळशिल्पे, किल्ले या बाबींवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. माधव कदम यांनी 'असा हा सिंधुदुर्ग' हा ग्रंथ लिहीला. या ग्रंथामध्ये त्यांनी सिंधुदुर्ग जिल्हयाच्या समग्र इतिहासाची माहिती दिलेली आहे.

परंतु ती एकत्रित नाही. प्र.के.घाणेकर यांनी 'कोकणातील पर्यटन' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात कोकणातील पर्यटन स्थळांचा आढावा घेण्यात आलेला आहे. गो. नि. दांडेकर यांनी महाराष्ट्रातील किल्ले हा ग्रंथ लिहिला. यात महाराष्ट्रातील फक्त प्रमुख किल्ल्यांचा समावेश आहे. इतर ऐतिहासिक स्थळांचा उल्लेख नाही. त्याचप्रमाणे डॉ. सतीश लळित यांनी 'सिंधुदुर्ग जिल्हयातील कातळशिल्पे' हा कातळशिल्पांची माहिती देणारा ग्रंथ लिहिला आहे. तसेच डॉ. व्ही. जे. भास्कर यांनी रत्नागिरी जिल्हयातील स्वातंत्र्यचळवळीचा अभ्यास केला आहे. डॉ. सोमनाथ कदम यांनी सिंधुदुर्ग जिल्यातील पर्यटन स्थळांसंदर्भात शोधनिबंध सादर केला आहे. प्रा. सुरेश पाटील, रणजित हिर्लेकर यांनी सिंधुदुर्ग जिल्हयातील लेणी, गुहा, कुणकेश्वर या धार्मिक स्थळांचा अभ्यास करून शोधनिबंध सादर केला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१) सिंधुदुर्ग जिल्हयाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२) सिंधुदुर्ग जिल्हयातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व अभ्यासणे.

३) सिंधुदुर्ग जिल्हयातील धार्मिक वारसा स्थळांची पार्श्वभूमी अभ्यासणे.

४) सिंधुदुर्ग जिल्हा व लगतच्या परिसरातील कातळशिल्पांचा अभ्यास करणे.

५) सिंधुदुर्ग जिल्हयातील इतिहासकालीन वखारी, राजवाडे, बंदरे यांचा शोध घेऊन त्यांचे महत्व अधोरेखित करणे.

६) सिंधुदुर्ग जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीत हौतात्म्य पत्करलेल्या क्रांतिकारकांच्या स्मारकांचे महत्व समाजापुढे आणणे.

7) सिंधुदुर्ग जिल्हयातील वारसा पर्यटनास उत्तेजन मिळण्यासाठी प्रेरणादायी संशोधन प्रकाशात आणणे.

संशोधनाची गृहीतके :

१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात भुईकोट, डोंगरी, जलदुर्ग, अशा प्रकारचे किल्ले आढळतात.

२) सिंधुदुर्ग जिल्ह्यांतर्गत प्राचीन मंदिरे आढळतात.

३) सिंधुदुर्ग जिल्हा व लगतच्या परिसरात आदिम संस्कृतीचा वारसा सांगणारी कातळशिल्पे मोठ्या प्रमाणावर सापडली आहेत.

४) सिंधुदुर्ग जिल्ह्यात गुहा, किल्ले, मंदिरे, चर्चेस, राजवाडे, लेणी स्मारके अशी पर्यटनस्थळे विखुरलेली आहेत.

५) सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटनाच्या विकासाच्या दृष्टीने ऐतिहासिक स्थळांना विशेष महत्व आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, संदर्भ पद्धती, मुलाखत पद्धती, ग्रंथालय, सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करायचे योजले आहे.

तथ्य संकलन :

तथ्य संकलनाशिवाय कोणतेही संशोधन कार्य अपूर्णच आहे. कोणतेही संशोधन कार्य करायचे असेल तर संकलन हा भाग अनिवार्य आहे. प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करत असताना खालील दोन पद्धतीने तथ्य संकलन करण्याचे योजले आहे.

१) प्राथमिक स्त्रोत :

कोणत्याही संशोधनाचा प्राथमिक स्त्रोत हा मुख्य आधार असतो. प्राथमिक साधनांच्या शिवाय इतिहास लेखनपूर्ण होऊ शकत नाही. प्रस्तुत अभ्यासासाठी रत्नागिरी जिल्ह्याचे गॅझेट, मुंबई व कोल्हापूर संग्रहालयातील आलेख, कागदपत्रे, मठ येथील शिलालेख, सावंतवाडी राजवाड्यातील पुराभिलेखागार तसेचे मंदिरातील दस्ताऐवज अभ्यासकांच्या मुलाखती, जिल्ह्यातील मूर्तीशिल्पे, कातळशिल्पे, वीरगळ व ऐतिहासिक वास्तु, वस्तु इ. प्राथमिक स्त्रोत अभ्यासण्यात येणार आहेत.

२) द्वितीय / दुय्यम स्त्रोत :

इतिहस संशोधन करीत असताना प्राथमिक साधना प्रमाणेच दुय्यम साधने ही तितकीच महत्वाची ठरतात. सिंधुदुर्ग जिल्हयातील काही संशोधक अभ्यासकांनी लिहिलेले ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, आदि दुय्यम स्त्रोतांचा आधार घेऊन प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्याचा संशोधकाचा हेतु आहे.

संशोधन प्रकरण रचना :

प्रस्तुत संशोधन विषयाची प्रकरण निहाय मांडणी खालील प्रमाणे करता येईल.

प्रकरण पहिले: प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणामध्ये संबंधित विषयाची प्रस्तावना, विषयाचा प्रकरणानुसार आराखडा,वापरण्यात येणारी संशोधन पद्धती, संशोधनाची उद्दिष्टये, गृहीतके, वापरण्यात येणारी संदर्भ साधने याची माहिती देण्यात येईल. शोध प्रबंधांची मांडणी करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या संशोधन पद्धतीची माहिती देण्यात येईल.

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी ऐतिहासिक, सर्वेक्षण, वर्णनात्मक, संदर्भ पद्धती, विश्लेषणात्मक, मुलाखत पद्धती, या पद्धतींचा अवलंब करण्याचे योजले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील वारसापर्यटन स्थळांचा ऐतिहासिक पद्धतीने अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : सिंधुदुर्ग जिल्हयाची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी

सिंधुदुर्ग जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी या मध्ये जिल्हयाची निर्मिती तालुके, स्थान व विस्तार, क्षेत्रफळ, हवामान, सीमा, पर्जन्यमान याची माहिती दुसऱ्या प्रकरणात देण्यात येईल. प्राचीन काळी भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील भूप्रदेशाला 'अपरान्त' हे नाव होते. आताच्या सिंधुदुर्ग जिल्हयाला स्वतःचा असा प्राचीन इतिहास आहे. विविध राज्यसत्ता व राजघराणी सिंधुदुर्ग जिल्हयाच्या प्रदेशामध्ये सत्तारूढ होती. यामध्ये मौर्ये, सातवाहन चालुक्य, शिलाहार, यादव, आदिलशाही, मराठा साम्राज्य या सारख्या राज्यसत्तांची सत्ता कोकण प्रदेशावर असलेली पहायला मिळते. या सर्व प्राचीन राजसत्ता त्यांचे प्रशासन, ऐतिहासिक पुरावे यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : सिंधुदुर्ग जिल्हयातील किल्ले-वारसा पर्यटन स्थळे

सिंधुदुर्ग जिल्हयात अनेक ऐतिहासिक किल्ले असून पूर्वी प्रदेशांच्या संरक्षणासाठी किल्ल्यांची मदत मोठया प्रमाणात घेतली जात असत. सिंधुदुर्ग जिल्हयात डोंगरी किल्ले व जलदुर्ग प्रामुख्याने आढळुन येतात. यामध्ये सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, पद्मगड, सर्जेकोट, राजकोट, रांगणागड, मनसंतोष गड, यशवंतगड, देवगड, भरतगड, रामगड, भगवंतगड, सिंहगड, सदानंदगड, शिवगड, निवती किल्ला, पारगड या सारखे अनेक किल्ले इतिहासाचा वारसा सांगतात. या किल्ल्यांच्या मदतीने हिंदवी स्वराज्याची स्थापना छत्रपती शिवाजी महाराजांनी केली. किल्ल्यांच्या मदतीने प्रदेशाचे संरक्षण झाले. या सर्व किल्ल्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, महत्व, रचना, सद्यस्थिती यांची मांडणी तिसऱ्या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण चौथे : सिंधुदुर्ग जिल्हयातील धार्मिक वारसा पर्यटन स्थळे

सिंधुदुर्ग जिल्हयात प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील अनेक धार्मिक स्थळे आहेत. हिंदू, जैन, बौद्ध, मुस्लिम, ख्रिश्चन, इ. सर्व धर्मियांची पवित्र धार्मिक स्थळे या ठिकाणी असलेली पाहावयास मिळतात. यात हिंदू धर्मियांच्या मंदिरांमध्ये प्राचीन शिवमंदिर कुणकेश्वर, इतिहासकालीन रामेश्वर मंदिर, विमलेश्वर मंदिर, अखंड दगडातील रामेश्वर मंदिर, सिंधुदुर्गातील सर्वात मोठी जत्रा असलेले भराडी देवी मंदिर, सोनुर्ले देवी मंदिर, याक्षिणी मंदिर या सारखी हिंदू श्रद्धास्थाने, उभादांडा येथीक रोमन कॅथलिक ऐतिहासिक चर्च, बौद्धविहार, मशिदी, जैन धार्मिक स्थळे या सर्व धार्मिक वारसा स्थळांची माहिती चौथ्या प्रकरणात समाविष्ट करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : सिंधुदुर्ग जिल्हयातील प्राचीन कातळशिल्पे - वारसा पर्यटन स्थळे

कोकणात अनेक ठिकाणी मध्ययुगीन व आधुनिक वस्तूंचा वारसा आजही अस्तित्वात आहे. परंतु इतिहासपूर्व काळातील मानवी संस्कृतीच्या पाऊलखुणा मात्र कोकणात नोंदल्या गेल्याचे दिसत नव्हते. विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात रत्नागिरी जिल्हयात रास्ता रुंदीकरणाचे काम सुरू असताना कातळावर कोरलेली चित्रे दिसून आली. व कोकणातील इतिहासाला नवी कलाटणी मिळाली.

कोकणातील ही कातळशिल्पे रत्नागिरी ते सिंधुदुर्ग परिसरात जवळपास १७० कि. मी. लांब व २५ कि. मी. रुंद पट्ट्यात आढळली आहेत. कोकण परिसरात मिळून जवळपास 700 पेक्षा जास्त कातळशिल्पे आढळून आली आहेत. या प्रकरणात सिंधुदुर्गासह लगतच्या प्रदेशात सापडणारी कातळशिल्पे, त्यांची वैशिष्ट्ये, रचना, ऐतिहासिक महत्व या सर्वांवर या प्रकरणात प्रकाश टाकण्यात येणार आहे. कातळशिल्पाच्या विकासातून एक नवे पर्यटनाचे क्षेत्र उपलब्ध होऊ शकते. पाचव्या प्रकरणात संशोधन पद्धती शास्त्रानुसार कातळशिल्प वारसा पर्यटन स्थळांची मांडणी केली जाईल.

प्रकरण सहावे : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संकीर्ण ऐतिहासिक वारसा पर्यटन स्थळे

सिंधुदुर्ग जिल्ह्यात किल्ले, धार्मिक स्थळे, कातळशिल्पे या बरोबरच इतरही ऐतिहासीक वारसा स्थळे इतिहासाच्या दृष्टीने महत्वाची ठरतात. यामध्ये सावंतवाडीचा राजवाडा, इतिहासकालीन बंदरे, ब्रिटिशकालीन वखारी, सत्याग्रहाची ठिकाणे, स्वातंत्र्यासाठी हौतात्म पत्करलेल्या हुतात्म्यांची स्मारके, शिलालेख, ताम्रपट अशा इतिहासाची आठवण करून देणाऱ्या ऐतिहासिक वारसा स्थळांची विस्तृत मांडणी संशोधन पद्धती शास्त्रं नुसार या केली जाईल.

प्रकरण सातवे : निष्कर्ष व शिफारशी

या संपूर्ण वारसा पर्यटन स्थळांचे फोटोग्राफ, माहितीपत्रके, मुलाखतींची अनुसूची नकाशे इत्यादी यादी जोडण्यात येणार आहे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, किल्ले, कातळशिल्पे राजवाडे, वखारी, या सर्वांचे ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टीने विश्लेषण केले जाणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटनात ऐतिहासिक स्थळांचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच उपलब्ध स्रोतांच्या आधारे महत्वपूर्ण निष्कर्ष नोंदवून काही शिफारसी सादर करण्यात येतील.

संदर्भ सूची :

“सिंधुदुर्ग जिल्ह्यातील स्मारके पर्यटन स्थळे - एक ऐतिहासिक अभ्यास” या विषयावर विद्यापीठ पातळीवर पीएच.डी पदवी साठी संशोधन करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी सध्या उपलब्ध झालेल्या संदर्भ ग्रंथाची सूची पुढीलप्रमाणे.

१) कोकणातील पर्यटन, प्र. के. घाणेकर, स्नेहल प्रकाशन, पुणे १९९७.
२) महाराष्ट्रातील प्राचीन लेणी, ओंकार वर्तले, नावीन्य प्रकाशन, पुणे.
३) सिंधुदुर्ग दर्शन, माधव कदम, सोनाली प्रकाशन, कणकवली २००६.
४) चला कोकणात, कामत भौला, उन्मेष प्रकाशन, पुणे.
५) दुर्गापलीकडचा सह्याद्री, प्र. के. घाणेकर, व आशुतोष बापट, स्नेहल प्रकाशन पुणे.
६) शिल्पसमृद्ध कोकण, प्र. के. घाणेकर, व आशुतोष बापट, स्नेहल प्रकाशन पुणे.
७) सावंतवाडी संस्थानाचा इतिहास, विठ्ठल पुरुषोत्तम पिंगूळकर, कुडाळ
८) शिवप्रभुंची शिवलंका : सिंधुदुर्ग किल्ला, श्रीकांत देसाई.
९) मैत्री सागरदुर्गांची, , प्र. के. घाणेकर, स्नेहल प्रकाशन पुणे.
१०) झुंजार माची (सिंधुदुर्ग किल्ला बांधकामावर आधारित) गो.नि.दांडेकर, मृण्मयी प्रकाशन पुणे.
११) शिलाहार राज वंशाचा इतिहास आणि कोरीवलेख, मिराशी. वा. वि. विदर्भ संशोधन मंडळ नागपूर, १९९४.
१२) सिंधुदुर्गातील कातळशिल्पे, सतीश लळित, घुंगुरकाठी प्रकाशन सावंतवाडी २०२१.
१३) कोकणातील देवालये, प्रा. सुहास बारटक्के, निर्मिती प्रकाशन पुणे.
१४) असा हा सिंधुदुर्ग, माधव कदम, युनिक प्रकाशन, सिंधुदुर्ग २०००.
१५) रत्नागिरी जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळी, संवाद प्रकाशन, कोल्हापूर २०२१.
१६) वेंगुर्लेतील डच वखार - एक विस्मृर्त इतिहास, राम आजगावकर लेख - दीपावली अंक १९९४.
१७) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर - रत्नागिरी जिल्हा.
१८) भारतीय स्वातंत्र्य चलवळींचा इतिहास, डॉ. जयसिंगराव पवार, निरालि प्रकाशन २०१८.
१९) प्रेक्षणीय महाराष्ट्र संग्रहय पर्यटन विशेषांक.
२०) मराठी विश्वकोश - खंड १, ४, ५, १२.

संशोधक विद्यार्थी — संशोधक मार्गदर्शक

प्रियांका विनायक पाटील — प्रा. डॉ.आर.एस.पारवे